21-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 20-04-2025 21:51 Page 1



## निवडक

### स्लो ओव्हर रेटसाठी शुभमन गिलला १२ लाखांचा दंड



**अहमदाबाद, दि. २० :** गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलला स्लो ओव्हर रेटसाठी १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. शनिवारी अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात डबल हेडरचा पहिला सामना खेळवण्यात आला.आयपीएलच्या नियम २.२२ अंतर्गत, गुजरात टायटन्सचा या हंगामातील स्लो ओव्हरचा हा पहिला अपराध होता. त्यामुळे कर्णधार शुभमन गिलला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

जोस बटलरच्या ९७ धावांच्या मदतीने गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ७ विकेट्सने पराभव केला. गुजरातने शनिवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीने ८ विकेट गमावल्यानंतर २०३ धावा केल्या. गुजरातने २० व्या षटकात केवळ ३ गडी गमावून लक्ष्य गाठले. ९७ धावा करणाऱ्या बटलरला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. गुजरातने हंगामातील पाचवा विजय नोंदवला, तर दिल्लीला दुसरा पराभव पत्करावा लागला. प्रसिद्ध कृष्णाने ४ बळी घेतले. बटलरने शेरफान रदरफोर्डसोबत शतकी भागीदारीही केली.

आयपीएल २०२५ च्या हंगामात स्लोओव्हरसाठी दंड आकारण्याची ही सहावी वेळ आहे. राजस्थान रॉयल्सना दोनदा, मुंबई इंडियन्स, ङ्कङ्कआणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्सना प्रत्येकी एकदा दंड ठोठावण्यात आला आहे.

आयपीएलने या हंगामात वारंवार ओव्हर-रेटच्या गुन्ह्यांसाठी खेळाडूंवरील बंदी काढून टाकली आहे आणि खेळातील दंडाव्यतिरिक्त फक्त डिमेरिट पॉइंट्स आणि दंड आकारला जाईल.

---

### आरवली येथील वेतोबा मंदिरात १ मे रोजी नाट्यगीत गायन स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. २० :** वेंगुर्ला तालुक्यातील आरवली येथे श्री देव वेतोबा महाराजांच्या २९व्या पुनःप्रतिष्ठा वर्धापनदिनाच्या पूर्वसंध्येला १ मे रोजी (महाराष्ट्र दिन) सिंधुदुर्ग, गोवा, रत्नागिरी आणि कोल्हापूर जिल्हा मर्यादित तिसरी भव्य नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत प्रथम बक्षीस रु. १०,००० रोख व स्मृतिचिन्ह, द्वितीय रु. ७००० रोख,व स्मृतिचिन्ह तृतीय रु. ५००० रोख व स्मृतिचिन्ह तसेच उत्तेजनार्थ दोन बक्षिसे रु. २००० प्रत्येकी याप्रमाणे देऊन सन्मान करण्यात येणार आहे. या स्पर्धेत व्यावसायिक कलाकारांना प्रवेश दिला जाणार नाही, ही स्पर्धा, वय १८ पासून पुढच्या सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली असणार आहे. तसंच या स्पर्धेच्या गेल्या दोन वर्षातील प्रथम क्रमांक विजेत्या स्पर्धकाला या स्पर्धेत भाग घेता येणार नाही. स्पर्धेचे प्रवेश मूल्य ३०० रु. असून स्पर्धेसाठीची पात्रता फेरी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे.

त्यातून अंतिम २५ स्पर्धेकांची निवड करण्यात येईल. त्यासाठी इच्छुक स्पर्धेकांनी कुठल्याही नाट्यगीताचा एक मिनिटाचा मर्यादित व्हिडिओ श्री.किशोर सावंत व्हॉट्स ॲप क्र. ९८९०२१९४३५ यांच्याकडे २८ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावेत. त्यातून निवडलेल्या गेलेल्या स्पर्धेकांशी आयोजक संपर्क करतील. निवड झालेल्या स्पर्धकांनी दोन नाट्यगीतांची सूची आयोजकांकडे द्यावयची असून या दोन गीतांमधील परीक्षक सांगतील ते एक गीत स्पर्धकाने सादर करायचे आहे. ह्या स्पर्धेसाठी प्रवेश फी रु.३०० सह श्री.भालचंद्र दीक्षित यांच्या ९४२२९६७७८९ या क्रमांकावर गुगल पे द्वारा पाठवावी.

सर्व स्पर्धक व त्यांच्यासोबत आलेल्या दोन व्यक्तींची भोजन व्यवस्था आणि आवश्यक असल्यास दुरून येणाऱ्या स्पर्धकांची निवास व्यवस्था करण्यात येईल.आवश्यक वाटल्यास स्पर्धेच्या स्वरूपात ऐनवेळी बदल करण्याचा अधिकार आयोजकांकडे राहिल.

तरी सिंधुदुर्ग, गोवा, रत्नागिरी, आणि कोल्हापूर जिल्ह्यातील होतकरू कलाकारांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ही स्पर्धा यशस्वी करावी असे आवाहन श्री देव वेतोबा देवस्थान कमिटी, आरवली,आणि गावकर, मानकर यांचे वतीने करण्यात आले आहे.

---

### शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा : सभापती तवडकर

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**आगोंद, दि. २० :** शिका, संघटीत व्हा व संघर्ष करावा मंत्र बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. अंत्योदय घटकांचा विकासासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी प्राधान्य दिले. त्यांच्यामुळे आज शिक्षणाची द्वारे अंत्योदय घटकांसाठी खुली झाली. आज आपल्या देशातील लोकशाहीचा पाया मजबूत बनला आहे. ते थोर राजकारणी, तत्वज्ञ व दूरदृष्टी असलेले नेते होते. ललित समाजा विरुद्ध होणारा भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी एक चळवळच त्या काळी उभारलेली होती. भारतीय राज्यघटनेचे ते शिल्पकार होते, असे प्रतिपादन सभापती रमेश तवडकर यांनी केले.

काणकोण भाजप मंडळाने रुबी रेजिडेंनसी येथे भाजप कार्यालयात १३४वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त एका जाहीर कार्यक्रमाचे केले होते. यावेळी प्रमुख वक्ता म्हणून सभापती रमेश तवडकर उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

यावेळी भाजप मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर गावकर, सरचिटणीस दिवाकर पागी, नगरसेवक व. लक्ष्मण पागी, माजी अध्यक्ष विशाल देसाई, प्रदेश महिला प्रतिनिधी चंदा देसाई, भाजप दक्षिण गोवा उपाध्यक्ष व पैंगीणचे पंचसदस्य महेश नाईक, पंचसदस्य आनंदू देसाई, माजी जिपस. डॉ पुष्पा अय्या, ज्येष्ठ कार्यकर्ते नारायण देसाई, दिनेश नाईक, आनंदराव देसाई, रणजीत जाधव, राजेश बांदेकर व अन्य उपस्थित होते.

सुरुवातीला सरचिटणीस दिवाकर पागी यांनी प्रास्ताविक केले. भारत रत्न आंबेडकर यांच्या तस्विरीला प्रमुख पाहुणे सभापती तवडकर यांच्याहस्ते हार व पुष्प वाहून श्रद्धांजली वाहण्यात आली. तर त्या नंतर उपस्थित भाजपाचे विविध स्तरांवरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्प वाहून आदरांजली वाहिली. स्वागतपर भाषणात अध्यक्ष प्रभाकर गावकर यांनी आंबेडकर यांच्या जीवनावरील महत्त्वाचे पैलू विषद केले. सूत्रसंचालन दिवाकर पाडी तर चंदा देसाई हिने आभार व्यक्त केले. त्यानंतर भाजपच्या सर्व बुथ केंद्रावर स्थानिक कार्यकर्त्यांसह बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी केली.

---

### फोंडा येथे मे मध्ये संगीतवर्गाचे आयोजन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. २० :** राजीव गांधी कला मंदिर येथे तबला, गिटार, हामोर्नियम व गायन वर्गासाठी प्रवेश अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. या वर्गासाठी फोंडा तालुक्यातील इच्छुक विद्यार्थी व संगीतप्रेमींनी प्रवेश घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश अर्ज ५ मे पासून राजीव गांधी कला मंदिरात उपलब्ध असतील. अर्ज २० मे पर्यंत स्वीकारले जातील. प्रवेशासाठी निवड चाचणी घेतली जाईल. वर्गात प्रवेश घेण्यासाठी वय १० वर्षापेक्षा जास्त असणे अनिवार्य आहे. प्रवेश दोन गटात विभागण्यात येईल. वय १० ते १६ (५ वी ते १०वी) 'अ' गट व १७ ते ५० 'ब' गट असेल. ब गटातील विद्यार्थी व संगीतप्रेमींना छंदवर्ग घेण्यात येतील व त्याचा कालावधी दोन वर्षाचा असेल. प्रत्येक वर्गासाठी प्रथम येणाऱ्यांना प्राधान्य या तत्त्वावर गिटार, हार्मोनियम विभागात केवळ २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. गायन विभागात ५० विद्यार्थी व तबला विभागात ३० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

# बेंगळुरुसाठी कोहलीची 'विराट' खेळी

## बेंगळुरुचा ३ गड्यांनी सनसनाटी विजय | पंजाबचा घरच्याच मैदानावर लाजिरवाणा पराभव

**पंजाब, दि. २० :**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पंजाब किंग्जचा ७ विकेट्सने पराभव केला. आयपीएल २०२५ मध्ये आरसीबीचा हा पाचवा विजय आहे. या सामन्यात पंजाब संघाने प्रथम खेळताना १५७ धावा केल्या, ज्याला प्रत्युत्तर म्हणून बंगळुरू संघाने १९ व्या षटकात ७ विकेट्स शिल्लक असताना सहज लक्ष्य गाठले. आरसीबीकडून विराट कोहली आणि देवदत्त पडिकल यांनी अर्धशतके झळकावली. आम्ही तुम्हाला सांगतो की विराट आता आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक अर्धशतके करणारा फलंदाज बनला आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला १५८ धावांचे लक्ष्य मिळाले होते, ज्याला उत्तर देताना आरसीबीची सुरुवात खूपच खराब झाली. पहिल्याच षटकात फिल सॉल्ट फक्त १ धाव करून बाद झाला, पण त्यानंतर विराट कोहली आणि देवदत्त पडिकल यांनी १०३ धावांची भागीदारी करत आरसीबीला विजयाच्या उंबरठ्यावर आणले. पडिक्कलने ३५ चेंडूत पाच चौकार आणि चार षटकारांसह ६१ धावा केल्या. बेंगळुरूने १०९ धावांवर आपला दुसरा बळी गमावला, त्यानंतर कर्णधार रजत पाटीदार जास्त काळ क्रीजवर राहू शकला नाही आणि १२ धावा करून बाद झाला. विराट कोहली अजूनही क्रीजवर होता, त्याने ५४ चेंडूत ७३ धावा केल्या आणि आपल्या संघाचा विजय निश्चित केला.

विराट कोहली आता इंडियन प्रीमियर लीगच्या इतिहासात सर्वाधिक अर्धशतके करणारा फलंदाज बनला आहे. त्याने या बाबतीत डेव्हिड वॉर्नरला मागे टाकले आहे. पंजाब विरुद्ध बंगळुरू सामन्यापूर्वी, विराट कोहली आणि डेव्हिड वॉर्नर यांनी ६६ अर्धशतके केली होती. आता विराटने त्याचा ६% वा अर्धशतक ठोकून हा आयपीएल विक्रम आपल्या नावावर केला आहे. फक्त २ दिवसांपूर्वी, पावसामुळे प्रभावित झालेल्या सामन्यात, पंजाब किंग्जने आरसीबीचा ५ गडी राखून पराभव केला. आता बेंगळुरू संघाने दोन दिवसांपूर्वीच्या पराभवाचा बदला सहज विजय मिळवला आहे.



दुसरीकडे, कृणाल पांड्या आरसीबीचा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने त्याच्या ४ षटकांच्या स्पेलमध्ये फक्त २५ धावा खर्च केल्या आणि २ फलंदाजांना बाद केले. सुयश शर्मानेही ४ षटकांत २६ धावा देत २ बळी घेतले. या व्यतिरिक्त, रोमारियो शेफर्डने १ यश मिळवले. भुवनेश्वर कुमारनेही किफायतशीर गोलंदाजी केली, जरी त्याला एकही विकेट घेता आली नाही.

**दोन्ही संघांचे प्लेइंग-११**

**पंजाब किंग्ज :** श्रेयस अय्यर (कर्णधार), प्रभसिमरन सिंग, प्रियांश आर्य, नेहल वढेरा, मार्कस स्टोइनिस, जोश इंग्लिस (यष्टिरक्षक), शशांक सिंग, मार्को यान्सेन, अर्शदीप सिंग, झेवियर बार्टलेट, युजवेंद्र चहल.

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू :** रजत पाटीदार (कर्णधार), फिल सॉल्ट, विराट कोहली, टिम डेव्हिड, रोमॅरियो शेफर्ड, जितेश शर्मा (यष्टीरक्षक), क्रुणाल पंड्या, भुवनेश्वर कुमार, जोश हेजलवूड, सुयश शर्मा, यश दयाल.

# लखनौकडून राजस्थानचा २ धावांनी पराभव

- आवेश खानने शेवटच्या षटकात ९ धावा डिफेंड केल्या
- मार्करम-बदोनीची फिफ्टी

**जयपूर, दि. २० :**

आयपीएलच्या रोमांचक सामन्यात लखनौ सुपरजायंट्सने राजस्थान रॉयल्सचा २ धावांनी पराभव केला. आवेश खानने २० व्या षटकात ९ धावांचा बचाव केला आणि लखनौला विजय मिळवून दिला. आवेशने ३ विकेट घेतल्या. एडेन मार्करम आणि आयुष बदोनी दोघांनीही अर्धशतके झळकावली.

जयपूरमधील सवाई मानसिंग स्टेडियमवर लखनौने फलंदाजीचा निर्णय घेतला. लखनौने ५ विकेट गमावल्यानंतर १८० धावा केल्या. प्रत्युत्तरात राजस्थानला ५ विकेट गमावून फक्त १७८ धावा करता आल्या. यशस्वी जैस्वालने ७४ धावा केल्या. वानिंदू हसरंगाने २ बळी घेतले.

राजस्थान रॉयल्सला शेवटच्या षटकात ९ धावा हव्या होत्या. संघाकडून ध्रुव जुरेल आणि शिमरॉन हेटमायर मैदानावर होते. आवेशने पहिल्या चेंडूवर १ धाव आणि दुसऱ्या चेंडूवर २ धावा दिल्या. त्याने तिसऱ्या चेंडूवर हेटमायरला झेलबाद केले. चौथा चेंडू डॉट होता. त्यानंतर आवेशने पाचव्या चेंडूवर २ धावा दिल्या. शेवटच्या चेंडूवर ४ धावांची आवश्यकता होती, आवेशने फक्त १ धाव दिली आणि त्याच्या संघाला २ धावांनी विजय मिळवून दिला.

२० व्या षटकात शिमरॉन हेटमायर बाद झाला. आवेश खानने त्याला झेलबाद केले. हेटमायरने १२ धावा केल्या.

१८ व्या षटकात राजस्थानने २ विकेट गमावल्या. षटकाच्या पहिल्याच चेंडूवर आवेश खानने यॉर्कर टाकला आणि यशस्वी जैस्वाल बाद झाला. त्याने ७४ धावा केल्या. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर, आवेशने पुन्हा यॉर्कर टाकला, तो चेंडू रियान परागच्या पॅडवर लागला. लखनौने अपील केले आणि पंचांनी एलबीडब्ल्यूचा निर्णय दिला.

राजस्थानने दहाव्या षटकात दुसरी विकेटही गमावली. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर शार्दुल ठाकूरने बाउन्सर टाकला आणि नितीश राणा लाँग लेगवर झेलबाद झाला. राणाने ७ चेंडूत ८ धावा केल्या.

सर्वात कमी वयात आयपीएलमध्ये पदार्पण करणारा १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी ३४ धावा करून बाद झाला. नवव्या षटकात एडेन मार्करमने त्याला यष्टीचीत केले. त्याने यशस्वी जैस्वालसोबत ८५ धावांची सलामी भागीदारी केली.

यशस्वी जयस्वालने ९व्या षटकात आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याने एडेन मार्करमविरुद्ध एक धाव घेतली आणि ३१ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. १८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, राजस्थान रॉयल्सने पॉवरप्लेमध्ये झटपट सुरुवात केली. संघाने ६ षटकांत एकही विकेट न गमावता ६१ धावा केल्या.त्यांचे अर्धशतक पूर्ण केले. यशस्वी जैस्वालने षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर षटकार मारला आणि संघाचे अर्धशतक पूर्ण केले.

राजस्थानने वैभव सूर्यवंशीला इम्पॅक्ट खेळाडू बनवले आणि त्याला डावाची सुरुवात करण्यासाठी पाठवले. त्याने त्याच्या आयपीएल कारकिर्दीच्या पहिल्याच चेंडूवर शार्दुल ठाकूरविरुद्ध षटकार मारला. वैभवसोबत यशस्वी जैस्वाल देखील मैदानावर उपस्थित होता. राजस्थानने पहिल्या षटकात १३ धावा काढल्या.

# मेघालय आयडीसीच्या शिष्टमंडळाची गोवा-आयडीसीला भेट

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २० :** मेघालय औद्योगिक विकास महामंडळच्या १० सदस्यांच्या शिष्टमंडळाने आपल्या राज्यातील औद्योगिक विकास आणि प्रशासनाला चालना देण्याच्या उद्देशाने गोवा औद्योगिक विकास महामंडळ (गोवा-आयडीसी) ने अवलंबलेल्या सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने गोवा भेटीवर आले आहे.

एमआयडीसीचे अध्यक्ष आणि मेघालय सरकारचे माजी गृहमंत्री जेम्स के. संगमा यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळाने गोवा आयडीसीला भेट दिली. त्यांच्यासोबत एमआयडीसीचे सहा सह-अध्यक्ष होते, यामध्ये डोनबोक खिमडेत, डोन्कुपर सुमेर, रॅन्सम सुंगा, एम्बाहलँग सिमलेह, एल. एलाझर शायन आणि अल्फोन्स संगमा, तसेच एमआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक डेलानी डी. नोंगमालेह; एमआयडीसी सहाय्यक सरव्यवस्थापक-वित्त एम. दखार आणि एमआयडीसीचे सल्लागार केरलांग मालंगियांग यांच्यासह वरिष्ठ अधिकारी होते.

या भेटीचा उद्देश औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात दोन्ही राज्यांमध्ये परस्पर शिक्षण आणि सहकार्य वाढवणे हा होता. व्यावसायिक तक्रार निवारण यंत्रणा, नियामक सुधारणा, डिजिटल प्रशासन, आर्थिक सुधारणा आणि पायाभूत सुविधा विकास हे प्रमुख मुद्दे या भेटीमध्ये चर्चिले गेले.



गोवा-आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रविमल अभिषेक यांनी मेघायलहून आलेल्या या शिष्टमंडळाचे स्वागत केले. तसेच गोवो-आयडीच्या कामकाजाचा आढावा सादर केला. यावेळी त्यांनी गोवा-आयडीसीचे चालू उपक्रम तसेच राज्यातील औद्योगिक प्रशासनातील मान्यता प्रक्रियेचे सुलभिकरण, सेवा वितरण विस्तार आणि राज्यामध्ये रोजगार निर्मिती व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राबवलेल्या विविध उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला. पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत उद्योगांना प्रोत्साहन, महिला उद्योजकांचे सक्षमीकरण आणि आधुनिक डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे नवीन व्यवसाय स्थापन करण्याची प्रक्रिया सुलभ करणे याबाबत महामंडळाने राबवलेले प्रयत्न आणि सुधारणा मालिकेचीही रुपरेषा श्री. प्रविमल यांनी सादर केली.

सादरीकरणादरम्यान दाखवण्यात आलेला महत्त्वाचा उपक्रम म्हणजे ओपन पोर्टल होय. हा एकीकृत डिजिटल प्लॅटफॉर्म उद्योगांना एकाच ठिकाणी औद्योगिक भूखंडाचे वाटप, कायदेशीर मंजुरी, देयके, इमारत परवानगी आणि इस्टेट व्यवस्थापन अखंडपणे व्यवस्थापित करण्यास सक्षम करतो. मूलभूत ऑनलाइन अर्ज प्रणालीच्या तुलनेत अनेक वैशिष्ट्ये या पोर्टलमध्ये समाविष्ट आहे. रिअल-टाइम ट्रॅकिंग करतानाच हे पोर्टल अधिकृत सूचना-मान्यता स्वयंचलितपणे निर्माण करते. गतिमान, पारदर्शक आणि जबाबदारीही सुनिश्चित करत सुलभ सेवा या पोर्टलवरून सादर केली जाते, असे त्यांनी स्पष्ट केले.

डिजिटल पब्लिक गुड्स ओपन सोर्सचा वापर करून हा प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे. यामध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने मान्यता दिलेल्या सहजपणे उपलब्ध अशा डिजिटल टुलचा अवलंब करण्यात आला आहे. औद्योगिक विकासासाठी डीपीजीचा अवलंब करण्यात भारतामध्ये गोवा हे अग्रणी राज्यांपैकी एक राज्य ठरले आहे. ओपन पोर्टलमुळे गोवा-आयडीसीची सेवा मिळवण्यासाठी लागणाऱ्या कालावधी ६० टक्क्यांनी कमी झाला असून, कागदपत्रे आणि प्रक्रियाही सुलभ झाली असल्याने राज्यामध्ये व्यवसायसुलभता लक्षणीयरीत्या वाढली आहे. असेही श्री. अभिषेक यांनी स्पष्ट केले.

# पाकिस्तानचा भारतात वर्ल्ड कप खेळायला नकार!

## बीसीसीआय आणि आयसीसी ने हायब्रिड मॉडेल अंतर्गत न्यूट्रल व्हेन्यू ठरवावे

**कराची, दि. २० :**

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने एक मोठी घोषणा केली आहे की पाकिस्तान संघ २०२५ च्या महिला विश्वचषकासाठी भारतात जाणार नाही. हे जाणून घेऊया की २०२५ चा महिला विश्वचषक यावर्षी भारतीय भूमीवर होणार आहे. २९ सप्टेंबर ते २६ऑक्टोबर दरम्यान खेळल्या जाणाऱ्या महिला विश्वचषकात एकूण ८ संघ खेळतील. भारतात न जाण्याचे कारण देताना पीसीबी म्हणते की ज्याप्रमाणे चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये टीम इंडिया पाकिस्तानात आली नाही, त्याचप्रमाणे पाकिस्तान महिला संघही वर्ल्डकपसाठी भारतात जाणार नाही.

पीसीबीचे अध्यक्ष मोहसीन नक्वी म्हणाले, ज्याप्रमाणे भारत चॅम्पियन्स ट्रॉफी सामना खेळण्यासाठी पाकिस्तानात आला नव्हता आणि त्यांना तटस्थ ठिकाणी सामना खेळण्याची परवानगी देण्यात आली होती, त्याचप्रमाणे पाकिस्तान संघासाठी जे काही तटस्थ ठिकाण निवडले जाईल, तो संघ तिथे खेळण्यास तयार असेल. जेव्हा जेव्हा तडजोड होईल तेव्हा त्याचे पालन केले पाहिजे.

पाकिस्तान महिला क्रिकेट संघाने नुकताच २०२५ च्या महिला क्रिकेट विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आहे. महिला विश्वचषक पात्रता स्पर्धेत पाकिस्तानने त्यांचे सर्व ५ सामने जिंकून विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. पीसीबी प्रमुखांनी त्यांच्या संघाचे कौतुक केले आणि म्हणाले, आमच्या संघाने घरच्या मैदानाचा फायदा कसा घेता येतो हे दाखवून दिले आहे आणि आम्ही एक संघ म्हणून खेळलो. महिला क्रिकेट संघ चांगली कामगिरी करत आहे. हे पाहून मी खुश आहे.

बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी म्हणाले की, या शानदार कामगिरीसाठी पाकिस्तानी महिला संघाला पुरस्कार दिला जाईल. चॅम्पियन्स ट्रॉफीचा तो दौरा आठवा जेव्हा भारतीय संघ दुबईमध्ये खेळला होता. त्यावेळी पीसीबीने भारताचे सामने दुबईमध्ये आयोजित करण्यास सहमती दर्शवली होती, या अटीवर की भविष्यात भारतात होणाऱ्या कोणत्याही आयसीसी स्पर्धेत पाकिस्तान संघाचे सामने देखील तटस्थ ठिकाणी आयोजित केले जातील.

# अभिषेक नायर 'केकेआर'मध्ये सामील

**मुंबई, दि. २० :**

टीम इंडियाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदावरून काढून टाकण्यात आलेला अभिषेक नायर पुन्हा कोलकाता नाईट रायडर्समध्ये सामील झाला आहे. शनिवारी फ्रँचायझीने ही माहिती दिली. तथापि, या पोस्टमध्ये तो कोणत्या पदावर परतला आहे याचा उल्लेख नव्हता.

खरंतर, शुक्रवारी बीसीसीआयने अभिषेक नायरला टीम इंडियाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदावरून काढून टाकले होते. अभिषेक नायर व्यतिरिक्त, क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी दिलीप आणि प्रशिक्षक सोहम देसाई यांनाही टीम इंडियामधून काढून टाकण्यात आले. ऑस्ट्रेलियात २०२४-२५ मध्ये झालेल्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताच्या लाजिरवाण्या पराभवानंतर बीसीसीआयने ही कारवाई केली.

अभिषेक नायर २०१८ ते २०२४ पर्यंत आयपीएलमध्ये कोलकाता नाईट रायडर्सच्या कोचिंग स्टाफचा भाग होता. गेल्या वर्षी जुलैमध्ये त्याला भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या कोचिंग स्टाफमध्ये समाविष्ट करण्यात आले.

द्रविडचा कार्यकाळ २०२४ च्या टी-२० विश्वचषकानंतर संपला आहे. त्यानंतर बीसीसीआयने गंभीरला मुख्य प्रशिक्षक बनवले. गंभीरने कोलकाता नाईट रायडर्समधील त्याच्या सहकाऱ्यांना त्याचे सहकारी म्हणून संघात सामील केले होते.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होण्यापूर्वी, गंभीर केकेआरचे मार्गदर्शक होते आणि त्यावेळी अभिषेक नायर आणि रायन टेन डेशकाटे त्याच संघात सपोर्ट स्टाफ होते. मोर्ने मॉर्केलने गंभीरसोबत लखनौ सुपर जायंट्समध्ये काम केले होते. तथापि, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतील दारुण पराभवानंतर अभिषेकवर प्रश्न उपस्थित केले जात होते. त्यानंतर बीसीसीआयने एनसीए आणि इंडिया अ संघाचे प्रशिक्षक सीतांशू कोटक यांची भारतीय संघातील मर्यादित षटकांच्या क्रिकेटसाठी फलंदाजी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. भारताने पुन्हा एकदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २२८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 228 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .